# नाबार्ड-२९
# यशोगाथा



**अमरावती जिल्हयातील चांदुर बाजार तालुक्यातील चांदुर बाजार वलगाव कामुंजा कुड रस्ता रा.मा. २९८ रस्त्यावरील सा.क्र. ६/६०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे.(खरवाडी गावाजवळ) ता.चांदुर बाजार, जि. अमरावती.**

## पुलाची आवश्यकता :-

- अमरावती जिल्ह्यातील चांदुर बाजार तालुक्यातील खरवाडी (लोकसंख्या २०१०),खराळा (लोकसंख्या २०९०)आणि जवळा शहापुर (लोकसंख्या ३५००) या तीन गावांदरम्यान नाला वाहते.
- सदर ठिकाणी नाल्याचे पात्र ३०.०० मी. इतके आहे.
- या ठिकाणी नाल्यावरील पूल अरुंद व कमी उंचीचा असलयाने दरवर्षी पावसाळ्यात वाहतूक पूर्णपणे खंडीत होत होती.
- पावसाळा संपल्यानंतर दरवर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाला नाल्यावरील पुलाची किरकोळ दुरुस्ती करावी लागत होती.
- या नाल्यावर पूल बांधण्याची मागणी परिसरातील नागरिक सन २०१४ पासून करत होते.



पुलाचे बांधकाम होण्यापूर्वीचे छायाचित्रे



पुलाचे बांधकाम होण्यापूर्वीचे छायाचित्रे

# पुलाचे बांधकाम पुर्ण झाल्यामुळे झालेले फायदे

- पुलामुळे खरवाडी (जवळा शहापुर) व खराळा ही गावे जोडली गेल्याने बारमाही वाहतूक सुरू झाली. त्यामुळे तिन्ही गावातील एकूण ७६०० लोकसंख्येला फायदा झाला आहे.

- खराळा या गावामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र व माध्यमिक शाळा व हायस्कुल आहे. नाल्यापलीकडील खरवाडी व लगतच्या गावातील रहिवासी, रुग्ण व शालेय विद्यार्थ्यांना खराळा किवा चांदुर बाजार गावामध्ये जाण्यासाठी सुमारे ५.० कि.मी.च्या फे-याने जावे लागत होते. पूल झाल्यामुळे आता जाण्यासाठी १.०० व ५.०० कि.मी. अंतर लागत असल्याने नाला ओलांडून जाणे सोयीचे झाले आहे.

- राज्य मार्ग जोडला गेल्याने अमरावती,परतवाडा व मोर्शी शहराचे अंतर कमी होऊन नागरिकांसाठी दळणवळणाची सोय झाली आहे. त्यामुळे इंधन व वेळेची (२५ ते ३५ मिनिटे) बचत झाली आहे.

- खरवाडी गावा लगतच्या परिसरातील ३५१०.०० हेक्टर्स क्षेत्रफळ खराळा गावांच्या लगतच्या परिसरातील २९५०.०० हेक्टर्स क्षेत्रफळ असे एकूण ६४६०.०० हेक्टर्स क्षेत्रफळ लागवडी खाली आहे.
- याठिकाणी मुख्यतः संत्रा, गहु, कांदा,कपाशी, सोयाबीन, हरभरा ही पीके घेतली जातात.
- या ठिकाणी नाल्यावरील पूल कमी उंचीचा व अरुंद असल्यामुळे खरवाडी,वडूरा व तळवेल बाजूकडील गावांतील शेतक-यांना चांदुर बाजार व परतवाडा बाजारपेठेत शेतमाल नेण्यासाठी सुमारे १०.०० कि.मी. चा फेरा पडत असे.
- तसेच खराळा बाजूकडील शेतक-यांना अमरावती व दर्यापूर या तालुक्यांच्या ठिकाणी बाजारपेठेत शेतमाल पाठवताना अडचण होत होती व विलंबाने मालाची वहणावळ होत असे.
- पुलामुळे खरवाडी व खराळा व लगतच्या गावांचा मिळून एकूण ६४६०.०० हेक्टर्स क्षेत्रफळ लागवडी खालील शेतीला फायदा झाला आहे.
- पुलामुळे शेतमाल लवकरात लवकर व किफायतशीर वहनावळीमध्ये बाजारपेठेत पोहोचवणे शक्य झाले आहे.



- श्रीसंत गुलाबराव महाराज भक्तीधाम, प्रल्हादपुर , ता. बाजार जि.अमरावती नाल्यावर पूल झाल्यामुळे परिसरातील नागरिक, पर्यटक तसेच भाविकांकडून समाधान व्यक्त होत आहे.


# पुलाच्या कामाची माहिति

१. नाबार्ड २९ अंतर्गत सदर ठिकाणी लहान पुलाचे बांधकाम करण्याचे काम मंजूर झाले. (PIC No. – P )

२. सदर पुलाच्या बांधकामाची किंमत प्रशासकीय मान्यतेनुसार रु. २८० लक्ष इतकी आहे.

३. सदर पुल हा ७.०० मी. चे ३ गाळे असलेला २३.३० मी. लांबीचा आणि १२.०० मीटर रुंदीचा सबमर्सीबल पुल आहे. सदर पुलाची उंची ६.१८ मी. आहे.

४. जोड रस्त्याची लांबी १९८ मीटर आहे.




- नाल्यावरील पूल अरुंद व कमी उंचीचा असलयाने दरवर्षी पावसाळयात वाहतूक पूर्णपणे खंडीत झाल्यामुळे खरवाडीहुन  चांदुर बाजार येथे जाण्याकरीता मार्गे (Route A-A) सुमारे २०.०० कि.मी. अंतर लागत असे.
- पुल झाल्यामुळे खरवाडी ते चांदुर बाजार हे अंतर ५.०० कि.मी. इतके झाल्यामुळे अंतराची बचत होऊन पर्यायाने इंधनाची व वेळेची देखील मोठी बचत झाली आहे.

# अंतर, वेळ व इंधनामध्ये होणा-या बचतीचा तुलनात्मक तक्ता

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | सरासरी वाहनांची संख्या | अंतराची बचत (कि.मी) | वेळेची बचत (मिनिट) | इंधनाची बचत (लिटर) | किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बस | १५ | ८ | २५ | ४.५० | ४१०.०० |
| २ | ट्रक | १०० | ८ | ३० | ५.२० | ४५०.०० |
| ३ | कार, व्हॅन, तिन चाकी वाहन | ४२० | ८ | २० | १ | १२०.०० |
| ४ | मोटर सायकल, स्कूटर | ६८० | ८ | २० | ०.५० | ५४.०० |




**पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र**




**पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र**




**पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र**



पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र




**Bridge Location at – 21$^{0}$ 18‘50″ N, 77$^{0}$ $^{71}$′47″**

**Google Map**



कापुस शेतमालाची वाहतूक करतानाचे छायाचित्र



शेतीच्या मालाकरीता पुलाचा वापर करतानाचे छायाचित्र



पावसाळयामध्ये पुलाचा वापर करतानाचे छायाचित्र


२०८
वा
शौर्य दिन
भीमा
कोरेगाव
शौर्य
दिन
निमित्त महापराक्रमी
500 शुरवीरांना व त्यांच्या
शौर्याला
मानवंदना

- धन्यवाद